बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे

फॅशन कॉर्नर & गिफ्ट सेंटर प्रो. पराग आर. कटरे मो. 8698142221
राही जनरल एण्ड स्टेशनरी
कामठा चौक, कामठा रोड, आमगांव जि. गोंदिया (महा.)
चला जाऊया पूर्व विदर्भ पर्यटनाला
बेरार टाईम्स द्वारा प्रकाशित पर्यटन पुस्तिका उपलब्ध अंक व जाहिरातकरिता संपर्क स्थळ

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१० गोंदिया | अंक ३९ | बुधवार,दि.१ सप्टेंबर २०२१ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2019-2021

# मासळचा चैतन्येश्वर साखर कारखाना भंगारात



**लाखांदूर:** समृद्धीचे स्वप्न दाखवून सन २००० मध्ये पायाभरणी झालेला लाखांदूर तालुक्यातील मासळ येथील चैतन्येश?वर साखर कारखाना भंगारात पडला आहे. कारखान्याच्या नावावर फक्त लोखंडी सांगाळा उभा करुन कारखान्याला वाऱ्यावर सोडण्यात आले. या कारखान्याची संपूर्ण चौकशी करुन शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी मागणी लाखांदूर तालुका राष्ट्रवादी काँग्रेसकडून होत आहे. शेतकऱ्यांना न्याय न मिळाल्यास आक्रोश आंदोलन करण्याचा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस तालुकाध्यक्ष बालू चुन्नो, अँड. मोहन राऊत, प्रमोद प्रधान, मिलिंद डोंगरे, राकेश राऊत, रेशीम परशुरामकर, बाळू रणदिवे, किशोर वाघमारे, जीकिया पठाण, अमित फुलबांधे, मुदस्सीर पठाण, राजेश कावळे, रजनीकांत खंडारे, नरेश सोनटक्के यांनी पत्रपरिषदेतून केली आहे.

मासळ येथील चैतन्येश्वर साखर कारखाना उभारणीचे काम सन २००० मध्ये सुरू करण्यात आले. हा कारखाना उभा करण्यासाठी अनेक शेतकऱ्यांकडून शेअर्सरुपी मोठमोठया रक्कमा घेण्यात आल्या. तब्बल ९४ कोटींचे कर्ज घेण्यात आले. साखर कारखान्याकरीता ४० एकर शेतजमीन शेतकऱ्यांकडून त्यांच्या मुलांना कारखान्यात नोकरीचे आमिष देऊन नाममात्र किंमतीत विकत घेण्यात आल्या. त्यापैकी तीस एकर जागेचे विक्रीपत्र झालेले असून दहा एकर जागेचे विक्रीपत्र अद्याप झालेले नाही. त्यामुळे अनेक शेतकरी भूमिहीन झालेत.

कारखान्याकरीता लाखांदूर तालुक्यातील सहा गावात सेंटर उभारण्यात आले होते. यामध्ये मासळ, आसगाव, विरली बु., परसोडी /नाग, पालांदूर, बारव्हा या गावी ऊस लागवडीकरीता व शेअर्स जमा करण्याकरिता सात कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती.

शेतकऱ्यांनी ऊसाची लागवड केली. त्यांचा ऊस बिजाईत म्हणून वापरला गेला. त्यांच्या ऊसाची रक्कम अद्याप मिळाली नाही. काही शेतकऱ्यांचा ऊस गुळ बनवण्याकरीता वापरण्यात आला. विविध सेंटरवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे मानधन व सेंटरच्या कार्यालयाचा भाडा देण्यात आला नाही. एवढ्या मोठ्या जागेचा व रकमांचा गैरव्यवहार झाल्यानंतर चैतन्येश्वर साखर कारखाना बंद करण्यात आला. त्या ठिकाणी कोणत्याही मशीन आणण्यात आल्या नव्हत्या. अनेक शेतकऱ्यांच्या शेअर्सरूपी मोठया रकमा, उसाची थकबाकी, कर्मचाऱ्यांचे मानधन, कार्यालयाचा भाडा असा कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार करण्यात आलेला असून दोर्षीवर अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. आजघडीला कारखान्याच्या नावावर फक्त लोखंडी सांगाळा शेतकऱ्यांचे दु:ख पाहत उभा आहे.

**बंद कारखान्यावर कर्जाची उचल**

मासळ येथील चैतन्येश्वर साखर कारखाना सुरुवातीपासूनच बंद अवस्थेत आहे. साधी मशिनही लावण्यात आली नाही. असे असताना या कारखान्यावर २०११ पासून २०१५ पर्यत कोट्यवधी रुपयांच्या कर्जाची उचल करण्यात आली आहे. तसेच एप्रिल २०२१ मध्ये बुलढाणा अर्बन बँकेच्या नागपूर शाखेतून ४ कोटींचे कर्ज उचलण्यात आले आहे. एवढ?ा मोठया प्रमाणात कर्ज घेऊनही कारखाना पूर्णत्वास जात नसेल तर कोट्यवधी रुपयांच्या कर्जाचे काय झाले? याचे उत्तर जनतेला मिळावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस तालुकाध्यक्ष बालू चुन्ने यांनी केली आहे.

# ओबीसींचे देशातील नेतृत्व छगन भुजबळांनी करावे-शरद यादव

## *ओबीसीआरक्षणासाठी "शरद यादव' यांचे मोलाचे योगदान
## *ओबीसी आरक्षणासाठी आता सर्वांनी एकत्र येण्याची गरज
## *मंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते शरद यादव यांचा सत्कार




**नवी दिल्ली:** आपल्या संघर्षमय जीवनात शरद यादव यांनी ओबीसी समाजासाठी रचनात्मक कार्य केले आहे. ओबीसी समाजाला आरक्षण मिळावे यासाठी मोलाचे योगदान मंडल चळवळीचे योध्या राहिलेले माजी खासदार शरद यादव यांनी दिल्याचे प्रतिपादन महाराष्ट्राचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री तथा अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदचे राष्ट्रीय अध्यक्ष छगन भुजबळ यांनी केले. दिल्लीतील कॉन्स्टिट्युशनल क्लबमध्ये झालेल्या ओबीसी महासभेच्यावतीने आयोजित मंडल जंयती कार्यक्रमात ना. भुजबळ बोलत होते.

ओबीसी समाजाला आरक्षण मिळावे यासाठी शरद यादव यांनी केलेल्या कार्याचा गौरव करण्यासाठी राष्ट्रीय ओबीसी महासभेने दिल्लीत कार्यक्रम आयोजित करून महाराष्ट्राचे मंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते शरद यादव यांचा सत्कार केला. कार्यक्रमाचे अध्यक्ष तामिळनाडूचे राज्यसभा एड.खासदार पी.विल्सन होते.

माजी खासदार शरद यादव यांनी ओबीसी वर्गाला आरक्षण मिळावे यासाठी केलेली मोर्चेबांधणी आजही आम्हाला माहीत आहे. शरद यादव यांनी अगदी न्यायालयीन लढाई पासून आंदोलन करण्यापर्यत महत्वाची भूमिका निभावल्याची आठवण छगन भुजबळ यांनी करून दिली. मंडल आयोगाच्या शिफारशी लागू करताना झालेल्या विविध गोर्ष्टींवर देखील छगन भुजबळ यांनी सविस्तर भाष्य केले.

यावेळी बोलतांना आपल्या भाषणात माजी खासदार शरद यादव म्हणाले की ओबीसी समाजाला आरक्षण मिळवून देताना आम्ही मोठा संघर्ष केला, यात शंका नाही. पण आता ओबीसी आरक्षणावर निर्माण झालेल्या प्रश्नांवर देखील मोठा लढा दिला पाहिजे. आणि या देशव्यापी आंदोलनाचे नेतृत्व छगन भुजबळ यांनी करावे. छगन भुजबळ यांनी देखील ओबीसी आरक्षणासाठी संघर्ष केला आहे, त्यामुळे आता देशव्यापी लढा त्यांनी उभारावा आम्ही त्यांच्या सोबत असल्याचे विचार व्यक्त केले.

कार्यक्रमाला युवा नेते हार्दिक पटेल, माजी खासदार राजकुमार सैनी, खासदार गणेश सिंह, माजी विधानसभा अध्यक्ष उदय नारायण चौधरी, अंतरराष्ट्रीय संत्यशोधक समाजाचे मुख्य संयोजक सुनिल सरदार, माजी खासदार बी.के. हरीप्रसादर, माजी मंत्री कमलेश्वर पटेल, आमदार बिहार सतिशकुमार, वरिष्ठ समाजसेवक फुलसिंह बघेल, राजवीरसिंह बघेल, ओबीसी महासभेचे विजयकुमार, धर्मेंद्र कुशवाह यांच्यासह ओबीसी महासभेचे पदाधिकारी उपस्थित होते. देशभरातील ओबीसी विचारवंत व कार्यकर्त्यांनीही उपस्थिती लावली होती.




# क्रीडा संकुलाला लोकार्पणाची प्रतीक्षा




**सालेकसा:** येथील तालुका क्रीडा संकुलाचे भूमिपूजन होऊन अकरा वर्षे लोटली. परंतु अद्याप क्रीडा संकुलाचे लोकार्पण झाले नाही. त्यामुळे खेळाडूंमध्ये नाराजीचा सुर आहे. इतकेच नव्हे तर या क्रीडा संकुलात सुविधांचाही अभाव दिसून येत आहे.

येथील मनोहरभाई पटेल मोक्षधाम समिती व वनक्षेत्राधिकारी कार्यालयालगतच्या रस्त्यावर शासनाने तालुका क्रीडा संकुलाचे बांधकाम केले. बांधकामाकरिता कोट्यावधी रुपये खर्च झाले. तत्पुर्वी २००९ मध्ये तत्कालीन क्रीडामंत्री पदमाकर वळवी यांच्या हस्ते क्रीडा संकुलाचे भूमिपूजन झाले. या कार्यक्रमाला तत्कालीन पालकमंत्री अनिल देशमुख, माजी आमदार रामरतनबापू राऊत यांच्यासह इतर मान्यवरांनी हजेरी लावली होती. भूमिपूजनानंतर लवकरच इमारत उभी होईल असे वाटले. त्यानुसार बांधकामसुद्धा करण्यात आले. क्रीडा संकुल येथे तालुक्यातील युवक रोज सकाळी व्यायाम करण्याकरिता येत असतात. मात्र गेल्या अकरा वर्षांपासून लोकार्पण सोहळा झाला नाही. त्यामुळे खेळाडूंमध्ये नाराजीचा सुर आहे. इतकेच नव्हे तर या क्रीडा संकुलात सुविधांचाही अभाव आहे. केरकचरा साचला असून जागोजागी खड्डेही पडले आहेत. दरम्यान, संबंधित विभागाने लक्ष देऊन तालुका क्रीडा संकुलाचे त्वरित लोकार्पण करावे, सुविधा पुरवाव्यात, अशी मागणी तालुकावासीयांनी केली आहे.

# फुलचूर नगरपंचायतीचा प्रस्ताव धुळखात

गोंदिया : शहरालगतच्या फुलचूर आणि फुलचूरटोला या दोन ग्रामपंचायतीचा समायोजन करून नगर पंचायतीचा दर्जा देण्यात यावा, २१ डिसेंबर २०१९ रोजी दोन्ही ग्रा.पं.कडून प्रस्ताव सादर करून जिल्हा प्रशासनाकडे पाठविण्यात आला. मात्र या संदर्भात मार्गदर्शन व सुचनाच्या नावाखाली जिल्हा प्रशासनाकडून नगरपंचायतीचा प्रस्ताव पाठविण्यासाठी सतत टाळाटाळ केली जात आहे. नगर विकास मंत्रालयाने या संदर्भात तसा प्रस्ताव पाठविण्याची सुचनाही जिल्हा प्रशासनाला केल्यानंतरही दोन वर्षापासून तो प्रस्ताव धुळखात पडला आहे. यामुळे फुलचूर आणि फुलचूरटोला यो दोन्ही गावातील नागरिकांमध्ये जिल्हा प्रशासनाविरुद्ध रोष निर्माण झाला आहे. प्रस्ताव पाठविण्यात आले नाही, तर अन्नत्याग सत्याग्रह करण्याचा इशाराही संतप्त नागरिकांकडून करण्यात आला आहे.

शहरालगतच्या फुलचूर व फुलचूरटोला या दोन्ही ग्रामपंचायतींची सीमा एकमेकाला लागुन आहेत. तसेच जिल्हा मुख्यालय, जिल्हा परिषद , जिल्हा पोलिस अधीक्षक कार्यालय हे महत्वाचे कार्यालय या गाव क्षेत्रात मोडतात. त्या अनुषंगाने संबंधित ग्रामपंचायतीच्या वतीने २०१९ मध्ये प्रस्ताव सादर करण्यात आला. त्या प्रस्तावाची छाणनी करून २६ फेब्रुवारी २०२० रोजी जिल्हाधिका?यांनी जनगणना, अकृषक व सर्वेक्षण पूर्ण केले व तो प्रस्ताव शासनाला सादर करणार, अशातच मार्च २०२० पासून संसर्गामुळे संचारबंदीची अंमलबजावणी करण्यात आली. परिणामी हा प्रस्ताव

# तीन गावांना जोडणारा रस्ता दुर्लक्षीत



**गोरेगाव:** तालुक्यातील गोंदिया-गोरेगाव या मुख्य मार्गावरील हिरडामाली येथून जवळच्या पुरगाव, सटवा व चिचगाव या तीन गावांना जोडणारा मुख्यमार्ग मागील अनेक वर्षांपासून दुर्लक्षित असून संबंधित विभागासह क्षेत्रातील लोकप्रतिनिधींचे याकडे दुर्लक्ष होत आहे. परिणामी या रस्त्यावर जागोजागी खड्डे पडले आहे. तर रस्ता कमी आणि खड्डे जास्त अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. या विषयी तिन्ही गावातील सरपंच व परिसरातील नागरिकांनी रस्ता दुरुस्तीसाठी संबंधित विभागाकडे अनेकदा मागणी करूनही साधे खड्डे भरण्याचे सौजन्य दाखविण्यात आले नाही.

२० वर्षापुर्वी हा रस्ता जिल्हा परिषदेच्या अंतर्गत बांधण्यात आला होता. त्यानंतर एकदाही या रस्त्याची दुरुस्ती करण्यात आलेली नाही. अशा स्थितीत रस्त्याची स्थिती रहदारी योग्य नाही. या मार्गावर एसटी बसचे साधन नसल्यामुळे जिथे मोठ्या संख्येने विद्यार्थी सायलकवर गोरेगाव शहरात येतात. त्यातच ग्रामस्थ आणि कर्मचारी सुद्धा या रस्त्याने गोरेगाव येथे कार्यालयात किंवा इतर कामासाठी येत असतात. परंतु येथे रस्त्याची जीर्ण अवस्था अपघातांना आमंत्रण देत आहे. अशा परिस्थितीत रात्रीच्या वेळी रस्ता पार करणे आणखीच अवघड झाले आहे. तेव्हा या रस्त्याची दुरुस्ती अत्यंत महत्वाची आहे. दरम्यान, संबंधित विभागातील वरिष्ठ अधिकारी व क्षेत्रातील लोकप्रतिनिधींनी याकडे लक्ष देत नव्याने रस्ता बांधकाम करण्याची मागणी पुरगावचे सरपंच अनंत ठाकरे व सटवा गावचे सरपंच विनोद पारधी यांनी केली आहे.

**गावाची जिल्ह्यात ओळख**

पुरगाव मार्ग हा हिरडामाली पेट्रोल पंपाजवळून गेलेला असून हिरडामाली या गावात जिल्ह्यातील काही मोठ्या पुढाऱ्यांचे निवासस्थान आहे. त्यातच पुरगाव हे गाव जिल्ह्यात स्वच्छ भारत अभियानाच्या माध्यमातून जिल्ह्यात प्रसिद्ध असून सटवा गावही स्मार्ट गाव म्हणून जिल्ह्यात ओळखला जातो.

# अनुदानाकरीता शेतकऱ्यांनी केले विहिरीत आंदोलन



**गोंदिया** : धडक सिंचन विहिर योजनेअंतर्गत दोन वर्षांपासून प्रलंबित अनुदान देण्यात यावे, वीज जोडणी त्वरित करण्यात यावी, या मागणीसाठी लाभार्थी शेतकऱ्यांनी सोमवारी (ता. ३०) सालेकसा तालुक्यातील भजेपार येथे पाणी भरलेल्या विहिरीत उतरून अनोखे आंदोलन केले. प्रहार संघटनेच्या बॅनरखाली हे आंदोलन करण्यात आले.

शासनाच्या धडक सिंचन विहिर योजनेअंतर्गत २०१९-२० मध्ये जिल्ह्यातील जवळपास ५०० शेतकऱ्यांना प्रती लाभाथी अडीच लाख रुपये विहिर बांधकामासाठी मंजूर झाले होते. शेतकऱ्यांनी कर्जबाजारी होत प्रसंगी उसणवारी करत विहिर बांधकाम केले. परंतु, दोन वर्षांचा कालावधी लोटला तरी, मंजूर निधी लाभार्थ्यांना मिळाला नाही. हा निधी मिळावा, म्हणून बहुतांश पीडित लाभार्थ्यांनी शासन, प्रशासनाकडे कित्येकदा पत्रव्यवहार केला. निवेदने दिली. तरीही प्रशासनाला जाग आली नाही. त्यामुळे लाभार्थी शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट निर्माण झाले आहे. दरम्यान, संतप्त झालेल्या लाभाथी शेतकऱ्यांनी प्रहार संघटनेच्या बॅनरखाली भजेपार येथील छगन बहेकार यांच्या शेतातील विहिरीत उतरून अनोखे आंदोलन केले. मागण्यांची पूर्तता जोपर्यंत होणार नाही, तोपर्यंत आंदोलन सुरूच राहील, अशी भूमिका आंदोलकांनी घेतल्याने प्रशासन हादरले. त्यांनी तत्काळ आंदोलनस्थळ गाठून आंदोलक शेतकऱ्यांची समजूत घातली. परंतु, जिल्हाधिकारी आंदोलनस्थळी येऊन आमच्या मागण्या मान्य करणार नाही, तोपर्यंत आंदोलन सुरूच राहील, असे आंदोलकांनी तालुका प्रशासनाला ठणकावून सांगितले. सकाळी १० च्या सुमारास सुरू झालेले आंदोलन नंतर विहिरीतून बाहेर येत मंडपात सुरूकरण्यात आले.

आंदोलनात प्रल्हाद बहेकार, छगन बहेकार, टायकराम ब्राह्मणकर, भागवत बहेकार, जागेश्वर भांडारकर, रघूनाथ चुटे, पुरुषोत्तम बहेकार, आमगाव तालुकाध्यक्ष सुनील गिरडकर, सालेकसा तालुकाध्यक्ष अभय कुराहे, मिथीलेश दमाहे, जय मच्छिरके, विशाल दसरिया, चंदू बदवाईक, सुभाष उईके, देवा टेकाम, बंटी बावनथडे आदी सहभागी झाले होते. आंदोलनस्थळी सालेकसाचे ठाणेदार अरविंद राऊत, तलाठी नागपुरे यांच्यासह पंचायत समितीचे अधिकारी उपस्थित होते.

# महाआवास योजनेच्या माध्यमातून घरकुलाचे स्वप्न साकार करूया-प्राजक्ता लवंगारे-वर्मा




**नागपूर:** महाआवास योजनेच्या माध्यमातून केंद्र व राज्य शासनातर्फे ग्रामीण भागातील बेघर कुटुंबांसाठी गृहबांधणीचे महत्त्वाकांक्षी अभियान राबविण्यात आले असून, या अभियानामध्ये विभागातून गोंदिया व वर्धा जिल्ह्यात सर्वोत्कृष्ट काम झाले आहे. महिलांच्या वित्त संस्थांचा घरबांधणीसाठीचा सहभाग कौतुकास्पद आहे. ग्रामीण भागातील प्रत्येक गरजवंताला हक्काचा निवारा उपलब्ध करुन देण्यासाठी लोकसहभाग वाढविण्याचे आवाहन विभागीय आयुक्त श्रीमती प्राजक्ता लवंगारे-वर्मा यांनी आज येथे केले.

महाआवास अभियानाच्या अंमलबजावणीमध्ये येणा?या अडचणी प्राधान्याने सोडविण्यासोबतच राज्यात सवीत्कृष्ट विभाग म्हणून नागपूर नावलौकिक मिळवेल, असा विश्वास श्रीमती लवंगारे-वर्मा यांनी व्यक्त केला.

विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात महाआवास अभियानांतर्गत केंद्र व राज्य शासनाच्या ग्रामीण गृहनिर्माण अभियानामध्ये सवीकृष्ट कार्य करणाऱ्या जिल्हा, तालुका आणि ग्रामपंचायत तसेच वित्तीय संस्थांचा गौरव करण्यात आला. त्याप्रसंगी मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या.

वर्धेच्या जिल्हा परिषद अध्यक्षा श्रीमती सरिता गाखरे, भंडारा जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप डांगे, वर्धा जिल्हा परिषद अपर मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बढे, विकास उपायुक्त अंकुश केदार, सहायक आयुक्त सुनील निकम यांच्यासह वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.

सर्वांसाठी घरे २०२२ या महत्त्वाकांक्षी योजनेंतर्गत हक्काचे घर मिळावे, यासाठी महाआवास योजना राबवित आहे. लोकसहभागामुळेच या योजनेचे रुपांतर अभियानात झाले आहे. विभागातील पुस्कारप्राप्त जिल्ह्यांनी यापुढेही अंमलबजावणीमध्ये सातत्य ठेवून केंद्र शासनाचे पुरस्कार मिळवावेत, असे आवाहन विभागीय आयुक्त श्रीमती लवंगारे-वर्मा यांनी केले.

महाराष्ट्राने देशाला संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान ही योजना दिली. या योजनेच्या यशस्वीतेमुळे गावातील समस्या गावातच सोडविता येतात, हे सिद्ध झाले. त्यामध्ये लोकसहभाग महत्त्वपूर्ण असून, कोविड संसर्गाच्या पार्श्वभूमीवरही विभागातील नागरिक सक्रिय सहभागी झाल्यामुळे हे यश मिळाले आहे, असे सांगताना महाराष्ट्राच्या संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानाची चर्चा देशभरात सर्वत्र झाली असल्याचे श्रीमती लवंगारे -वर्मा यांनी सांगितले.

नोव्हेंबर २०२० ते जून २०२१ या कालावधीत केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजना व इतर राज्यपुरस्कृत विविध आवास योजनांना गतिमान करणे व गुणवत्ता वाढीसाठी राज्यात महाआवास अभियान ग्रामीणची अंमलबजावणी करण्यात आली असून, या योजनेच्या

## ▌उत्कृष्ट कार्याबद्दल विभागीय पुरस्कारांचे वितरण
## ▌गोंदिया व वर्धा जिल्हा ठरला सर्वोत्कृष्ट
## ▌महाआवास योजना मासिकाचे विमोचन

माध्यमातून कामे केलेल्या जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायतींनी केवळ एवढ्यावरच न थांबता केंद्र शासनाचे पुरस्कार मिळविण्यासाठी प्रयत्न करावेत, असेही श्रीमती लवंगारे-वर्मा यांनी सांगितले.

प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत १ लाख ६२ हजार ३८३ घरकुलांची बांधकामे पूर्ण करण्यात आली असून राज्य पुरस्कृत आवास योजनेंतर्गत एकूण ४८ हजार ८९८ घरकुलांचे बांधकाम पूर्ण झाले आहे. महाआवास अभियान ग्रामीण अंतर्गत विभागीय स्तरामध्ये केंद्र पुरस्कृत प्रधानमंत्री आवास योजनेमध्ये सवीत्कृष्ट जिल्ह्याचा प्रथम पुरस्कार गोंदिया जिल्ह्याला प्राप्त झाला आहे. तसेच द्वितीय पुरस्कार भंडारा जिल्हा तर तृतीय पुरस्कारासाठी वर्धा जिल्ह्याला प्राप्त झाला.

उत्कृष्ट तालुक्यामध्ये प्रथम, द्वितीय व तृतीय तालुका म्हणून गोंदिया जिल्ह्यातील गोरेगाव, गोंदिया व तिरोडा पंचायत समितीला अनुक्रमे पुरस्काराचे वितरण करण्यात आले. त्यासोबतच उत्कृष्ट ग्रामपंचायत म्हणून गोंदिया जिल्ह्यातील तळेगाव, द्वितीय कोरंबी तसेच केसोरी या अर्जुनी मोरगाव तालुक्यातील गावांना पुरस्कार प्राप्त झाले. तृतीय पुरस्कार वर्धा जिल्ह्यातील इंझाळा ग्रामपंचायतीला मिळाला.

प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत घरकूल बांधकामासाठी कर्ज देणारी वित्तीय संस्था म्हणून वर्धा जिल्ह्याची नारी शक्ती प्रभात संघ सिंधीविहिरी (कारंजा), द्वितीय भंडारा जिल्ह्यातील बँक ऑफ इंडिया, आंधळगाव तर तृतीय वर्धा जिल्ह्यातील हिरकणी प्रभाग संघ, अंदोरी(देवळी) तसेच जागा व वाळू उपलब्ध करुन देण्यासाठी प्रथम वरोरा तालुका, द्वितीय कामठी तालुका तर तृतीय भद्रावतीचा पुरस्कारप्राप्त तालुक्यांमध्ये समावेश आहे.




**राज्य पुरस्कृत आवास योजनेत वर्धा प्रथम**

राज्य पुरस्कृत आवास योजनेमध्ये सवीकृष्ट जिल्हा म्हणून वर्धा जिल्ह्याला पुरस्कार मिळाला असून, द्वितीय क्रमांक भंडारा जिल्ह्याला तर तृतीय क्रमांक चंद्रपूर जिल्ह्याला प्राप्त झाला आहे. उत्कृष्ट तालुक्यामध्ये प्रथम सडक अर्जुनी (गोंदिया), द्वितीय लाखांदूर, तृतीय पवनी पंचायत समिती, जिल्हा भंडाराने पटकावला आहे.

उत्कृष्ट ग्रामपंचायतीमध्ये ग्रामपंचायत बोरगाव (चंद्रपूर), द्वितीय दिघोरी (भंडारा) तर तृतीय सानगाव (साकोली) व ग्रामपंचायत चिचूर (कुही) नागपूर जिल्ह्याची या ग्रामपंचायतींनी पुरस्कार पटकावला. बांधकामासाठी कर्ज देणारी उत्कृष्ट वित्तीय संस्था म्हणून प्रथम वर्धा जिल्ह्यातील समानता प्रभाग संघ, समुद्रपूर, द्वितीय परिवर्तन प्रभाग संघ सेलू तर तृतीय सार्थक प्रभाग संघ वायफळ या वर्धा जिल्ह्यातील तीनही संस्थांचा या पुरस्कारप्राप्त ग्रामपंचायतींमध्ये समावेश आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपायुक्त अंकुश केदार यांनी तर आभार सहाय्यक आयुक्त सुनिल निकम यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिनेश मासोदकर यांनी केले.

# विद्युत पुरवठ्याची गुणवत्ता वाढवावी-ऊर्जामंत्री डॉ.नितीन राऊत



**गोंदिया :** राज्यातील ग्रामीण भागात शेतीसह औद्योगिक विकास होणे गरजेचे आहे. बेरोजगारांना रोजगार मिळावा यासाठी ग्रामीण भागात उद्योग उभारावे लागतील. उद्योग उभारण्यासाठी वीज आवश्यक आहे. जिल्ह्यातील नागरिकांच्या विद्युत पुरवठ्याबाबत अनेक समस्या असल्याचे दिसून येत आहे.त्यामुळे गोंदिया जिल्ह्यातील विद्युत पुरवठ्याची गुणवत्ता वाढविण्यात यावी, असे निर्देश राज्याचे ऊर्जा मंत्री डॉ.नितीन राऊत यांनी दिले.

२८ ऑगस्ट रोजी एन.एम .डी.कालेज सभागृह, गोंदिया येथे आयोजित आढावा बैठकीत डॉ.राऊत बोलत होते. यावेळी आमदार सहेषराम कोरोटे,महावितरणचे प्रादेशिक संचालक सुहास रंगारी, मुख्य अभियंता गोंदिया श्री वासनिक, अधिक्षक अभियंता गोंदिया सम्राट वाघमारे, अधिक्षक अभियंता भंडारा राजेश नाईक, कार्यकारी अभियंता गोंदिया श्री वानखेडे, कार्यकारी अभियंता देवरी श्री फुलझेले, महापारेषणचे अधिक्षक अभियंता श्री अने, महावितरण अभियंता आनंद जैन, गोंदिया महावितरणचे जनसंपर्क अधिकारी अविनाश साखरे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

डॉ.राऊत पुढे म्हणाले, कृषिपंप वीज जोडणी धोरण-२०२० अंतर्गत अर्जदारांचे कृषिपंप वीज जोडणीची प्रकरणे प्रलंबीत न ठेवता तातडीने निकाली काढण्यात यावी. डॉ.बाबासाहेब आंबेडकर जीवन प्रकाश योजनेचा लाभार्थ्यांना लाभ देण्यात यावा. योग्य नियोजन करुन जिल्ह्यातील ग्राहकांना सुरळीत वीज पुरवठा कसा देता येईल याकडे लक्ष केंद्रीत करावे.भंडारा येथील विद्युत शॉर्ट सर्कीटच्या घटनेची पुनरावृत्ती गोंदिया जिल्ह्यात होऊ नये म्हणून सर्व शासकीय कार्यालयातील फायर ऑडिट लवकरात लवकर झाले पाहिजे असे त्यांनी यावेळी सांगितले.आमदार श्री कोरोटे म्हणाले, ककोडी येथे विद्युत वितरणचे सब स्टेशन तयार कण्यात यावे, जेणेकरुन त्या भागातील नागरिकांचे विद्युत पुरवठ्याची समस्या दूर होण्यास मदत होईल. यासाठी आदिवासी विकास मंत्रालयाकडून निधी उपलब्ध करुन देण्यात यावा अशी मागणी त्यांनी यावेळी मंत्री महोदयांकडे केली. वीज वितरण विभागाचे कर्मचारी ग्राहकांच्या समस्यांचे निराकरण न करता उलटसुलट उत्तरे देतात याबाबत संबंधितांवर योग्यती कार्यवाही करण्यात यावी असे त्यांनी यावेळी सांगितले.

### भूमीगत लघुदाब विद्युत वाहिनीचे ऊर्जा मंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण

**गोंदिया येथील मनोहरभाई कॉलनी येथे २८ ऑगस्ट रोजी ऊर्जा मंत्री डॉ.नितीन राऊत यांच्या हस्ते भूमीगत केलेल्या लघुदाब विद्युत वाहिनीचे लोकार्पण करण्यात आले. ही भूमीगत विद्युत वाहिनी ४ कि.मी. पर्यत राहणार असून त्याचा लाभ परिसरातील ग्राहकांना होणार आहे. भविष्यात संपूर्ण गोंदिया शहरात भूमीगत विद्युत वाहिनी निर्मिती करण्यात येणार आहे, असे त्यांनी यावेळी सांगितले. कार्यक्रमास पदाधिकारी व महावितरणचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.**

प्रास्ताविकातून अधिक्षक अभियंता सम्राट वाघमारे यांनी विद्युत विभागामार्फत गोंदिया जिल्ह्यात राबविण्यात येणाऱ्या एकात्मिक ऊर्जा विकास योजना, दिनदयाल उपाध्याय ग्रामज्योती योजना, पुर्व विदर्भ योजना, कृषिपंप उच्चदाब वितरण प्रणाली योजना, मुख्यमंत्री सौर कृषिपंप योजना, कृषिपंप वीज जोडणी धोरण-२०२०, मुख्यमंत्री सौर कृषि वाहिनी योजना इत्यादी योजनेबाबत संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून सादरीकरणाद्वारे मंत्री महोदयांना विस्तृत माहिती दिली.

गोंदिया जिल्ह्यात ८ तालुके असून ५५६ ग्रामपंचायती आहेत. ९५४ गावे आहेत. गोंदिया महावितरण मंडळाअंतर्गत २ विभाग आहेत. उपविभाग ९ आहेत. शाखा ३३ आहेत तर मनुष्यबळ ८०१ आहे. जिल्ह्याअंतर्गत उपकेंद्र संख्या ४६ आहे. क्षमता ४२३.१५ एमव्हीए आहे. उच्चदाब वाहिनी ४५१४.९७ कि.मी.आहे. लघुदाब वाहिनी ९२०४.६७ कि.मी.आहे. वितरण रोहित्रे संख्या ८१८० आहे. वितरण रोहित्र क्षमता ५६२.६५ एमव्हीए आहे. जिल्ह्यात सद्यस्थितीत घरगुती ग्राहक संख्या २६४८३१ आहे. व्यवसायीक ग्राहक संख्या १३३४९ आहे. औद्योगिक ग्राहक संख्या २९५१ आहे. कृषि ग्राहक ३७६६६ आहेत. उच्चदाब ग्राहक ७९ आहेत. अशी माहिती बैठकीत देण्यात आली.

# ओबीसींना राजकीय आरक्षण मिळावे यावर सर्वांचेच एकमत!- मुख्यमंत्री उद्धव ठाकरे



**मुंबई:** ओबीसींना राजकीय आरक्षण मिळालेच पाहिजे या विषयावर सगळ्याच पक्षांचे एकमत आहे. यासंदर्भात आज सर्वपक्षीय बैठकीत प्राप्त झालेल्या सूचना, विविध पर्यायांचा अभ्यास करून येत्या शुक्रवारी यावर सर्वानुमते निर्णयाप्रत येण्यासाठी बैठक घेऊ असे मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी सांगितले.

ओबीसींच्या राजकीय आरक्षणासंदर्भात सह्याद्री अतिथीगृहात आयोजित करण्यात आलेल्या सर्वपक्षीय नेत्यांच्या बैठकीत ते बोलत होते. बैठकीस उपमुख्यमंत्री अजित पवार, महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, सार्वजनिक बांधकाम मंत्री अशोक चव्हाण, उद्योग मंत्री सुभाष देसाई, नगर विकास मंत्री एकनाथ शिंदे, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, इतर मागास वर्ग व बहूजन कल्याण मंत्री विजय वडेट्टीवार, परिवहन मंत्री ॲड.अनिल परब, विधान परिषदेतील विरोधी पक्ष नेते प्रवीण दरेकर, विधान सभेतील विरोधी पक्ष नेते देवेंद्र फडणवीस, आमदार कपिल पाटील, आमदार देवेंद्र भुयार यांच्यासह सर्व पक्षीय नेते सर्वश्री विनायक मेटे, जोगेंद्र कवाडे, राजेंद्र गवई, शैलेंद्र कांबळे, बाळासाहेब दोडतुले, मिलिंद रानडे, डॉ. अरुण सावंत आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

## शुक्रवारी पुन्हा सर्वपक्षीय बैठक

स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये ओबीसींना राजकीय आरक्षण मिळालेच पाहिजे यावर सर्वपक्षांचे एकमत आहे. राजकीय आरक्षणामध्ये येणा?या अडचणी दूर करण्याबाबत सर्वांनी केलेल्या सूचनांचे स्वागत आहे, असे सांगून मुख्यमंर्त्यांनी यासंबंधी विविध राजकीय पक्षांची मते आजच्या बैठकीत समजून घेतली.

ओबीसी आरक्षणाशिवाय स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका होऊ नयेत ही सर्वांचीच भावना असल्याचे ते म्हणाले. दरम्यान आजच्या बैठकीत प्राप्त झालेल्या सुचना आणि पर्यायांचा येत्या काही दिवसात अभ्यास करून येत्या शुक्रवारी यासंबंधाने सर्व सहमतीने निर्णय घेऊ असे ते म्हणाले. त्यांनी या महत्त्वाच्या प्रश्नावर निर्णय घेण्यासाठी सर्व पक्षीय नेते उपस्थित राहिल्याची बाब स्वागतार्ह असल्याचे सांगून ओबीसी आरक्षणासाठीची सर्वपक्षीय एकजुट आणि एकमत असेच टिकवून ठेऊया असेही म्हटले.

बैठकीत प्रास्ताविक करतांना मंत्री श्री. भुजबळ यांनी ओबीसी आरक्षणासंबंधात शासकीय पातळीवर करण्यात येत असलेल्या प्रयत्नांची माहिती दिली. विरोधी पक्ष नेते देवेंद्र फडणवीस यांच्यासह सर्व पक्षीय नेत्यांनी आरक्षण टिकवून ठेवण्यासाठीचे विविध पर्याय, सूचना यासंबंधातील आपली मते मांडली. निमंत्रित सर्वपक्षीय मान्यवरांनी या महत्त्वाच्या विषयावर सर्वपक्षीय बैठक आयोजित केल्याबद्दल मुख्यमंत्र्यांचे आभार मानले.

# रेमडेसिव्हिर काळाबाजार प्रकरणातील सहा आरोपी निर्दोष

## जिल्हा सत्र न्यायालयाच्या मुख्य न्यायदंडाधिकाऱ्यांचा निर्वाळा

**गोंदिया :** रेमडेसिव्हिर काळाबाजार प्रकरणात स्थानिक गुन्हे शाखा व गोंदिया शहर पोलिसांनी सापळा रचून अटक केलेल्या सहा आरोपींची गुरुवारी (ता. २६) जिल्हा व सत्र न्यायालय गोंदियाचे मुख्य न्यायदंडाधिकारी एस. जे. भट्टाचार्य यांनी निर्दोष मुक्तता केली.

स्थानिक गुन्हे शाखा व गोंदिया शहर पोलिसांनी रेमडेसिव्हिर इंजेक्शन व मिथाईल प्रेडनिसोलोन सोडियम इंजेक्शनच्या काळाबाजार प्रकरणात आरोपी अमोल चौधरी याला पकडले होते. त्याची चौकशी केली असता, त्याने संजय तुरकर व गाविका चौधरी यांची नावे सांगितली. त्यामुळे तिघांनाही ४ मे रोजी अटक केली होती. त्यानंतर या तिन्ही आरोपींना ५ मे रोजी न्यायालयात हजर करण्यात आले होते. न्यायालयाने तिन्ही आरोपींना तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली होती. दरम्यान, २ ऑगस्ट रोजी पोलिसांनी आरोपींविरुद्ध दोषारोपपत्र न्यायालयात सादर केले होते. त्याच दिवशी मुख्य न्यायदंडाधिकारी, गोंदिया यांनी आरोपींवर दोषारोप लावले. आरोपींनी दोषारोप फेटाळल्याने ४ ऑगस्ट रोजी साक्षपुराव्याकरिता सदर खटला न्यायालयात ठेवण्यात आला. याच दिवशी सरकारच्या बाजूने आरोपीविरुद्ध सहा साक्षीदार तपासण्यात आले. सरकारचे सगळे साक्षीदार तपासून व उभय पक्षांची बाजू ऐकूण गुरुवारी (ता. २६) मुख्य न्यायदंडाधिकारी एस. जे. भट्टाचार्य यांनी आरोपींची निर्दोष मुक्तता केली. आरोपी अमोल चौधरी व संजय तुरकर यांची बाजू ॲड. प्रवीण श्यामकुवर व ॲड. देवेंद्र उर्फ चंदू पारधी यांनी मांडली. तसेच आरोपी गाविका चौधरी यांची बाजू ॲड. अरुण उपवंशी यांनी मांडली.

याशिवाय दुसऱ्या प्रकरणात २० एप्रिल रोजी स्थानिक गुन्हे शाखा व गोंदिया शहर पोलिसांनी सापळा रचून आरोपी संजूकुमार बागडे याला रेमडेसिव्हिर इंजेक्शनचा काळाबाजार करताना पकडले होते. त्यानंतर त्याची चौकशी केली असता त्याने दर्पण वानखेडे व नीतेश चिंचखेडे यांची नावे सांगितली. त्यामुळे पोलिसांनी त्यांनाही अटक केली होती. तिन्ही आरोपींना २१ एप्रिल रोजी न्यायालयात हजर करण्यात आले होते. त्यांना पोलिस कोठडी सुनावण्यात आली होती.

दरम्यान, २ ऑगस्ट रोजी पोलिसांनी आरोपींविरुद्ध दोषारोपपत्र न्यायालयात सादर केले. त्याच दिवशी मुख्य न्यायदंडाधिकारी, गोंदिया यांनी आरोपींवर दोषारोप लावले. आरोपींनी दोषारोप फेटाळल्याने ४ ऑगस्ट रोजी साक्षपुराव्याकरिता सदर खटला न्यायालयात ठेवण्यात आला. याच दिवशी सरकारच्या बाजूने आरोपींविरुद्ध तीन साक्षीदार तपासण्यात आले. सरकारचे सगळे साक्षीदार तपासून व उभय पक्षांची बाजू ऐकूण गुरुवारी मुख्य न्यायदंडाधिकारी एस. जे. भट्टाचार्य यांनी तिन्ही आरोपींची निर्दोष मुक्तता केली. आरोपी संजूकुमार बागडे व नीतेश चिंचखेडे यांची बाजू ॲड. प्रकाश तोलानी व आरोपी दर्पण वानखेडे यांची बाजू ॲड. मोहन गुप्ता यांनी मांडली. उल्लेखनीय म्हणजे, जिल्हा व सत्र न्यायालयात प्रथमच रेमडेसिव्हिर प्रकरणाचा २४ दिवसांच्या आत न्यायनिवाडा करण्यात आला आहे.

# स्वतःच घर हे सुख,शांती आणि समाधान देतं-आमदार चंद्रिकापुरे



**अर्जुनी /मोर :-**अन्न, वस्त्र आणि निवारा या प्रत्येक व्यक्तींच्या मूलभूत गरजा असून आपलं स्वतःच घर असलं कि मनाला शांती सुख आणि समाधान लाभतं , तरी शासकीय घरकुल योजनेचा गरजू व्यक्तीनी लाभ घ्यावे असे आवाहन अर्जुनी/मोर विधानसभा मतदार संघांचे आमदार मनोहरराव चंद्रिकाकापुरे यांनी (ता. २८) केलं.

दरम्यान महाआवास अभियान ग्रामीण अंतर्गत केंद्र व राज्य पुरस्कृत घरकुल योजनेत उत्कृष्ट काम केलेल्या ग्रामपंचायतिच्या सरपंचांचा त्यांनी सत्कार केला. प्रशस्तीपत्र प्रदान करून सरपंचांचे कौतुक करण्यात आले.

येथील उमेदच्या सभागृहात आयोजित या सत्कार समारंभ कार्यक्रमात ग्रामपंचायत ताडगाव, कोरंभी, केशोरी, गुढरी, कुंभीटोला आणि पवनी /धाबे येथील सरपंचांना हे प्रशस्ती पत्र प्रदान करण्यात आलं.

पवनी /धाबे येथील सरपंच श्रीमती पपीताताई नंदेश्वर, उपसरपंच पराग कापगते आणि सदस्य कैलाश पंधरे यांनी स्वीकारला. या प्रसंगी उपस्थित सरपंचानी सांगितलं कि आम्ही केलेल्या उत्कृष्ट कार्याची ही पावती असून यापुढे अजूनही शासकीय पुरस्कार आपल्याच झोळीत आणण्याचा प्रयत्न करण्याचा विश्वास त्यांनी बोलून दाखविला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गटविकास अधिकारी विलास निमजे यांनी, संचालन विस्तार अधिकारी ब्राम्हणकर यांनी तर आभार स्वच्छता विभागाचे अंबुले यांनी केलं. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी सर्वच अभियंत्यांनी सहकार्य केलं.

## प्रदेश काँग्रेस कार्यकारीणीत सचिवपदी पी.जी.कटरे व वऱ्हाडेंचा समावेश



**गोंदियाः-** महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसची अखेर जम्बो कार्यकारीणी जाहीर झाली असून अखिल भारतीय काँग्रेसचे महासचिव के.सी.वेणुगोपाल यांनी प्रदेश अध्यक्ष नाना पटोलेंच्या टीमची घोषणा केली आहे. रात्री उशिरा नवीन प्रदेश कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. या नव्या कार्यकारिणीत १८ उपाध्यक्ष, १ खजिनदार, ६५ सरचिटणीस, १०४ चिटणीस आणि ६ प्रवक्त्यांचा समावेश करण्यात आला आहे. दिवंगत खासदार राजीव सातव यांची पत्नी डॉ. प्रज्ञा सातव यांना उपाध्यक्षपदी संधी देण्यात आली आहे.त्यामध्ये गोंदिया जिल्ह्यातून जिल्हा परिषदेचे माजी सभापती व जिल्हा काँग्रेसचे उपाध्यक्ष पी.जी.कटरे व अमर वऱ्हाडे यांची प्रदेश कार्यकारीणीवर चिटणीस(सचिव)म्हणून निवड करण्यात आली आहे. आपल्या निवडीचे श्रेय पी.जी.कटरे यांनी प्रदेश अध्यक्ष नानाभाऊ पटोलेसह काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांना दिले आहे. त्यांच्या निवडीबद्दल जिल्हाध्यक्ष नामदेव किरसान, झामसिंग बघेले, राधेलाल पटले, उषा मेंढे, उषा शहारे, पी.डी.चव्हाण, जितेंद्र कटरे, राजीव ठकरेले, जितेश राणे आदिंनी अभिनंदन केले आहे.

## मास्क, सोशल डिस्टन्सिंगचा फायदा :७८३ रुग्णांवर उपचार सुरु

**गोंदिया :** कोरोना प्रतिबंधासाठी मास्क वापरणे, सोशल डिस्टन्सिंगचे नियम घातले गेल्यामुळे त्याचा फायदा कोरोनासह इतर आजारांना आळा घालण्यासाठीही झाला. कोरोना काळात अनेकांनी मास्क वापरल्याने तसेच सुरक्षीत अंतर राखल्याने क्षयरोगाचा प्रसार कमी झाला. जिल्ह्यात सध्या ७८३ क्षयरोग रुग्णांवर उपचार सुरु असून त्यातील ६३८ क्षयरुग्णांना केंद्र शासनाच्या निक्षय पोषण योजनेतून प्रति महिना ५०० रुपये अनुदान सकस पोषण आहारासाठी देण्यात येत आहे.



जिल्ह्यात पुर्वी क्षयरोगाचे प्रमाण अधिक होते. दरम्यान राज्यातील इतर जिल्ह्याच्या तुलनेत ते अजूनही जास्तच आहे. परंतू कोरोना काळात आवश्यक ती खबरदारी प्रत्येकाकडूनच घेतली गेल्याने या काळात सदर रोगाचा प्रसार पुर्वीपेक्षा कमी झाला. तसेच कोरोनाच्या पार्श्वभूमीवर अनेकांनी औषधोपचारांची काळजी घेतल्याने क्षयरोग बरा होण्याचे प्रमाणही वाढले. क्षयरोग रुग्णांचे निदान करुन त्याचे समुळ उच्चाटन करण्यासाठी आरोग्य विभागातर्फे प्रयत्न केले जात आहेत. जे क्षयरुग्ण उपचार घेत आहेत त्यांना निक्षय पोषण योजनेतून दर महिन्याला ५०० रुपये देण्यात येतात. या रुग्णांना शासनाकडून औषधे मोफत मिळतात. रुग्णांना औषधोपचारासह सकस आहार मिळावा यासाठी ही योजना सुरु करण्यात आली आहे. या योजनेचा लाभ रुग्णांना उपचार सुरु असेपर्यंत दिला जातो. क्षयरोग रुग्णांना पौष्टिक आणि आरोग्याला लाभदायक आहार घेता यावा यासाठी क्षयरोग कार्यालयाकडून प्रति महिना पोषण आहार भत्ता म्हणून ५०० रुपये दिले जातात. जास्तीत जास्त २० महिन्यात क्षयरोगमुक्त- क्षयरोग रुग्णांचे वेळीच निदान झाले तर तो रुग्ण सहा महिन्यात पूर्णपणे बरा होण्याची शक्यता अधिक आहे. एमडीआर टीबी नियंत्रणात आणण्यासाठी सुमारे २८ महिन्याचा कालावधी लागतो.

**क्षयरोगाची लक्षणे-** रात्री येणारा ताप, १५ दिवसापेक्षा जास्त कालावधीपर्यंत खोकला, छातीत दुखणे, खोकल्यातून रक्त पडणे, वजन कमी होणे ही क्षयरोगाची लक्षणे आहेत. यातील कोणतेही लक्षणे आढळून आल्यास लगेचच थुंकीची तपासणी करणे आवश्यक आहे.

**- जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ.रा.ज.पराडकर**

## पवनी /धाबे येथं विकास कामांचे भूमिपूजन



**अर्जुनी /मोर :-**अंतर्गत गोठणगाव जिल्हा परिषद गटात येणा?या पवनी /धाबे इथं विविध कामांचे भूमिपूजन करण्यात आले. अर्जुनी /मोर विधानसभा मतदार संघांचे आमदार मनोहरराव चंद्रिकापुरे यांच्या हस्ते भूमिपूजन झाले.

विकास कामांमुळे गावची प्रगती होते असे प्रतिपादन करून आमदार चंद्रिकापुरे यांनी आमदार निधीतून कान्होली, पवनी /धाबे, तीडका, येलोडी, आणि झाशीनगर येथील गावांतर्गत रस्ते निर्माण करण्याचा प्रण केला.

दरम्यान पवनी/धाबेच्या सरपंच श्रीमती पपीताताई नंदेश्वर, उपसरपंच पराग कापगते यांच्या शिस्टमंडळाने भेटून विविध मागण्यांचे निवेदन सादर केले. निवेदनात गावातील विकास कामे करण्याबरोबरच राज्यात इयत्ता १ली पासून शाळा सुरु करणे, गोंदिया चंद्रपूर पससेंजर लोकल ट्रेन सुरु करणे आदि मागण्यांची विनंती केली. तर ग्रामपंचायत येरंडी/दर्रेच्या उपसरपंच श्रीमती सोनिया वाढई आणि प्रकाश शहारे यांनी निवेदन सादर करून मोबाईल टॉवर आणि वाचनालयाची मागणी केली.यावेळी गावकरी नागरिक उपस्थित होते.

# महावितरण, महापारेषण व महानिर्मिती कंपनीतील अभियंता ६ सप्टेंबरपासून संपावर

**गोंदिया :** प्रलंबित मागण्यांना घेऊन कित्येकदा प्रशासनासोबत चर्चा करूनही प्रशासन उदासीन असून अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्यामुळे आता महावितरण, महापारेषण व महानिर्मिती कंपनीतील अभियंता ६ सप्टेंबरपासून संपावर जाण्याचा निर्णय सबॉर्डिनेट इंजिनियर्स असोसिएशनने घेतला आहे.सध्या सुरु असलेला कोरोना प्रादुर्भाव असो की, वादळ व पुरासारख्या नैसर्गिक आपत्ती राज्यातील वीज ग्राहकांना अखंड वीज पुरवठा देण्यासाठी महावितरण, महापारेषण व महानिर्मिती या वीज क्षेत्रात काम करणारे अभियंता नेहमीच तत्पर असतात. आपल्या जीवाची पर्वा न करता ते आपले कर्तव्य पार पाडत आहेत. एवढेच नव्हे तर कंपनीची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता वीज बिल वसुलीसाठीही ते झटत आहेत. असे असतानाही त्यांच्या प्रलंबित मागण्यांसाठी तिन्ही कंपन्यांचे प्रशासन उदासीन आहे. प्रलंबित मागण्यांसाठी कित्येकदा कंपनी प्रशासनासोबत चर्चा करूनही प्रशासनाकडून काहीच प्रतिसाद मिळत नसल्याने मात्र आता अभियंत्यांमध्ये प्रशासनाला घेऊन रोष व्याप्त आहे.

**या आहेत असोसिएशनच्या मागण्या**

महावितरण कंपनीतील आवश्यक रिक्त पदे ही संकल्पना रद्द करा, तिन्ही कंपन्यांतील अभियंत्यांची पदोन्नती करा, महानिर्मिती कंपनीतील एकतर्फी बदली धोरण व फॅक्टरी अलाऊंस लागू करू नये, संघटनेला विश्वासात न घेता प्रशासनातर्फे नवीन भरती धोरण व सेवा विनियम एकतर्फी लागू करू नये, वीज बिल वसुलीबाबत प्रशासनातर्फे चालविलेल्या दबाव तंत्रामुळे व त्यामुळे वाढलेले मारहाणीचे प्रकार बघता लोकसेवकाचा दर्जा द्यावा आदी असोसिएशनच्या मागण्या आहेत.

**५०७ उपकार्यकारी अभियंत्यांची पदे रिक्त होणार**

विशेष म्हणजे, स्टाफ सेटअपच्या नावावर अभियंत्यांची पदे कमी करण्याचा प्रयत्न सुरू असून १५ जूनपासून स्टाफ सेटअप लागू करून परिमंडळ स्तरावर कारवाई सुरु करण्यात आली आहे. यामुळे ५०७ उपकार्यकारी अभियंता व १४० अतिरिक्त कार्यकारी अभियंत्यांची पदे कमी होणार आहेत. अशात आता सबॉर्डिनेट इंजिनियर्स असोसिएशनने संपाचे हत्यार उपसण्याचा निर्णय घेतला असून ६ सप्टेंबरपासून संपावर जाण्याचा इशारा दिला आहे.

# तिकीट व्हेंडिग मशीनचा स्फोट;महिला वाहकाच्या हाताला दुखापत

**गोंदिया:** एसटीच्या तिकीट व्हेंडिग मशीनचा स्फोट झाल्याने महिला वाहकाच्या हाताला दुखापत झाली आहे. या मशीनसंदर्भात अनेक तक्रारी समोर आलेल्या असतानाच ही गंभीर घटना घडल्याने वाहकांमध्ये भीती पसरली आहे. या मशीनमुळे वाहकांसोबत प्रवाशांच्या जिवाला धोका निर्माण होण्याची शक्यता झाली आहे.

गोंदियात प्रवाशांना तिकीट दिल्यानंतर रूट बदल करीत असताना तिकीट मशीनमध्ये स्फोट होऊन कर्तव्यावर असलेली महिला वाहक गंभीर जखमी झाल्याची घटना गोंदियाच्या मुख्य बसस्थानक परिसरात घडली. महिला वाहकाचा केवळ पंजा भाजला असून सुदैवाने कोणतीही जिवीत हानी झाली नाही. मात्र त्या महिला वाहकाचे हात निकामी झाला आहे. कल्पना मेश्राम वय ३६ वर्ष असे जखमी महिला वाहकाचे नाव आहे.

**ब्लास्टनंतर व्हेडिंग मशीनची अवस्था**



ब्लास्टनंतर व्हेडिंग मशीनची अवस्था निकामी झालेलं मशीन दरम्यान, या प्रकरणी रामनगर पोलीस ठाण्यात सदर महिला वाहकाने तक्रार दाखल केली आहे. त्यामुळे एसटीच्या वाहकाजवळील तिकिट व्हेडिंग मशीन जिवंत बॉम्ब ठरत असल्याचे सिद्ध झाले असून भविष्यात मोठी दुर्घटना होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तेव्हा मॅन्युअल तिकिट पद्धत चलनात आणून इलेक्ट्रॉनिक तिकिट मशीन बंद करण्याची मागणी समोर आली आहे.

एसटी बसने प्रवास करतेवेळी तिकीट इश्यू मशीनच्या माध्यमातून प्रवाश्यांना तिकीट पुरविली जात आहे. तर एका खासगी कंपनीकडून या मशीन उपलब्ध करून देण्यात आल्या आहे. मात्र, अल्पावधीतच निकृष्ट दर्जाची बॅटरी, बटण काम न करणे, तिकिटांची रक्कम मशीनमध्ये दाखवणे मात्र तिकीट छपाई न होणे, चुकीचे तिकीट येणे अशा तक्रारी कर्मचाऱ्यांकडून येऊ लागल्या होत्या असे असले तरी महामंडळाकडून मशीन दुरुस्त करण्याबाबत एसटी कर्मचाऱ्यांना दाद दिली जात नाही. त्यातच बुधवारी गोंदिया येथे घडलेल्या घटनेने मशीन सदोष असण्याला दुजोरा मिळाला आहे.

त्याचप्रमाणे अशा घटना भविष्यात घडू नये यासाठी वाहकांना पुरविण्यात आलेल्या जुन्या मशीन महामंडळाने जमा करून त्यांना नवीन मशीन उपलब्ध करून देण्यात यावे, घटनेत जखमी झालेल्या महिला वाहक कल्पना मेश्राम यांना उपचार खर्च व आर्थिक मदत देण्यात यावी अशी मागणी आता करण्यात आली आहे

# स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त भाजपातर्फे निबंध स्पर्धेचे आयोजन



जिल्हाध्यक्ष केशवराव मानकर यांची माहिती

**गोंदिया :** देशाच्या स्वातंर्त्याच्या अमृत महोत्सवानिमित्त भारतीय जनता पाटी, महाराष्ट्राच्या माध्यम विभागातर्फे "गेल्या ७५ वर्षात देशाने काय कमावले ? काय करायचे बाकी आहे ?' या विषयावर राज्यस्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन केले आहे. ही स्पर्धा सर्व वयोगटातील नागरिकांसाठी खुली असून पहिल्या तीन विजेत्यांना अनुक्रमे पंचाहत्तर हजार, पन्नास हजार व पंचवीस हजार रुपयांची पारितोषिके देण्यात येतील तसेच स्पर्धेतील निवडक निबंधांचे संकलन करून एक ग्रंथ प्रकाशित करण्यात येईल, असे भाजपा जिल्हाध्यक्ष केशवराव मानकर यांनी सांगितले.

मानकर म्हणाले की, आपला देश १५ ऑगस्ट २०२१ रोजी स्वातंर्त्याची ७४ वर्षे पूर्ण करून अमृत महोत्सवी ७५ व्या वर्षात पदार्पण करत आहे. गेल्या ७४ वर्षात देशाने अनेक क्षेत्रात लक्षणीय प्रगती केली आहे. त्याचबरोबर करण्यासारखे बरेच काही राहून गेले आहे. अनेक संधींचा लाभ घेतला तर अनेक संधी गमावल्या. देशाची अर्थव्यवस्था, शेती, सिंचन, शिक्षण, संरक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा, सामाजिक सुधारणा अशा अनेक बाबतीत देशाची प्रगती झाली आहे पण त्याचबरोबर अनेक कामे करणे अद्यापही बाकी आहे. देशाच्या स्वातंत्र्यांच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने या सर्वाचा आढावा घेण्याची वेळ आली आहे. देशासंबंधीच्या महत्त्वाच्या विषयावर अमृतमंथन घडविण्यासाठी ही स्पर्धा आयोजित केली आहे.

त्यांनी सांगितले की, स्पर्धेसाठीचे निबंध चार हजार ते पाच हजार शब्दांचे असावेत, त्यामधील नोंदींच्या संदर्भांचा स्पष्ट उल्लेख असावा आणि निबंध संशोधनपर असावेत अशी अपेक्षा आहे. या निबंध स्पर्धेच्या निमित्ताने राज्यातील नागरिकांनी विविध विषयांवर व्यापक वाचन करावे आणि काही निश्चित विश्लेषणात्मक भूमिकेतून लेखन करावे, अशी अपेक्षा आहे. स्पर्धेसाठीचे निबंध bjpmedia@mahabjpmedia.org या २५ नोव्हेंबरपर्यंत ई मेलने पाठवावेत. विविध क्षेत्राशी संबंधित २५ विषयांची यादी निश्चित केली असून त्या पैकी कोणत्याही एका विषयावर मराठी, हिंदी किंवा इंग्रजी या भाषेत निबंध लिहावा. प्रत्येक भाषेसाठी स्वतंत्रपणे पारितोषिकांची व्यवस्था केली आहे. विषयांची यादी आणि स्पर्धेची नियमावली प्रदेश भाजपाच्या मनोगत या ॲपवर उपलब्ध आहे. गुगल प्लेस्टोअरवरून हे ॲप डाऊनलोड करून घेता येईल. हे ॲप https://bit.ly/3fhfYRp या लिंकवरही उपलब्ध आहे.

# ओबीसी करणार पंतप्रधान निवासाचा घेराव



## चिंतन बैठकीत निर्धार:२६ नोव्हेंबरला घेराव

**नागपूर:** ओबीसींच्या प्रश्नांकडे लक्ष वेधण्यासह जातीनिहाय जनगणनेच्या मागणीसाठी संविधानदिनी २६ नोव्हेंबरला १ कोटी ओबीसी बांधव दिल्लीतील पंतप्रधान निवासाला घेराव घालतील, असा निर्धार दोन दिवसीय ओबीसी चिंतन बैठकीत करण्यात आला.

ओबीसी जनगणना समन्वय समितीतर्फे शनिवार व रविवारी जवाहर वसतिगृहात दोन दिवसीय ओबीसी चिंतन बैठक पार पडली. समितीचे मुख्य संयोजक बळीराम धोटे, बंडू हजारे, प्रदीप ढोबळे, डॉ. वरदानी, धर्मपाल सिंग प्रजापती, प्रजापती एल.सी. राठोड यांच्यासह देशभरातील ओबीसी संघटनांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते. २६ नोव्हेंबर रोजी पंतप्रधानांच्या घराला घेराव घातला जाईल. याची तयारी आतापासूनच सुरु केली जाईल. सोशल मिडीयाच्या माध्यमातून जनजागृती केली जाईल. एकुण लोकसंख्येच्या किमान एक टक्के लोक दिल्लीला घेऊन जायचे लक्ष्य आहे. शासनाने ओबीसींचे अधिकार हिरावले आहे. त्याची परतफेड म्हणून रेल्वेने विनातिकीट दिल्ली गाठण्यात येईल. आरक्षणाचा मूलभूत आधार जनगणना आहे. ओबीसींच्या प्रश्नांचे ७० वर्षानंतरसुद्धा निराकरण झाले नाही. शासनाने समाजाच्या अस्तित्वाला नाकारले आहे.

याला राजकीय पक्ष आणि नेते जवाबदार आहे. या नेत्यांमुळे आपल्या समोर प्रश्न निर्माण झाले आहे. २८ नोव्हेंबरला महात्मा फुले स्मृतीदिनी लोकप्रतिनिधींना निवेदन दिले जाणार आहे. त्यातून नेत्यांना इशारा दिला जाईल. ओबीसी जनगणनेबाबत प्रश्न विचारले जातील. राजकीय पक्षावर दबाव निर्माण करण्यात येईल. यासोबतच नवीन राजकीय पर्यायासंदर्भात लोकांमध्ये जाऊन चर्चा करण्याचा निर्धारही या बैठकीत करण्यात आला.

या चिंतन शिबिरात विचार व्यक्त करतांना ओबीसी महासभेचे राष्ट्रीय संयोजक विजयकुमार म्हणाले की जनगणना होने आवश्यक आहे. सरकारनेही घोषणा केली होती. परंतु जेव्हा जनगनेचा चार्ट समोर आला तेव्हा ओबीसीची कॉलमच नसल्याचे दिसून आले. देशभरात जनगणनेसाठी आंदोलनाने धार धरली. आपल्यासाठी ही शेवटची संधी आहे सरकार पुढे निवडणुकाही अडचणीच्या ठरणार असल्याने डेडलाईन ठरवून काम करावे लागणार आहे.

सध्याची परिस्थिती बघता सडकेवर उतरल्याशिवाय ओबीसीना अधिकार मिळणार नाही बंद खोलीत डिल होते हिस्सेदारी मिळत नाही.तर एन.सी. राठोड म्हणाले



जनगणनेची आग देशभर लागलेली आहे. सर्वांनी एकत्र आले पाहिजे. शेतकरी नेते अविनाश काकडे म्हणाले की, ओबीसी समाजाला प्रतिक्रिया नव्हे क्रिया करावे लागेल. आम्ही कधीपर्यंत रडत बसणार आपल्याला राज्य करण्याची शक्ती निर्माण केल्याशिवाय पर्याय नाही. ओबीसीचे जेवढे संघटन तेवढेच राष्ट्रीय अध्यक्ष पण सर्वांचे लक्ष राजकारण आहे. त्यांना नियंत्रण करणारा नाही म्हणून देशपातळीवर कुणीही ओबीसी संघटनांना तेवढे महत्व देत नसल्याने त्यांना एकत्रित आणणे महत्वाचे झाले आहे. समाजासमोर उद्देश आपण देऊ शकलो नाही जनप्रतिनिधी हे नेता नव्हेत सम जावे लागेल.तर बाळासाहेब गावंडे म्हणाले की, ओबीसी आंदोलनाची देशात नीव कांशीराम यांच्यामुळेच रोवली गेली. संघटनाच्या विखुरल्यामुळे लाभ नाही त्या संघटीत व्हायले पाहिजे.

ओबीसी सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष इंजि. प्रदिप ढोबळे म्हणाले की जात हेच आरक्षणाचा आधार असू शकते असे इंदिरा साहनी प्रकणात म्हटले आहे. त्यासाठी जनगणना हवी.सामाजिक दायित्वसाठी आरक्षणाची गरज. प्रतिनिधीत्वसाठी संख्या महत्वाची आहे. ओबीसीची हवा तयार झाली जागृती झाली नाही म्हणूनच हवेच्या आधारावर मोदींना ओबीसी म्हणून मतदान केले आणि आपण फसलो हे कितीदा फसायचे हे ठरवावे लागेल सरकारला डेटा द्यायचाच नाही.त्यामुळे आपल्याला हवेतील शक्ती नको तर जागृत वैचारीक शक्तीवर आपले हक्क अधिकार मिळवून संविधानाचे रक्षण करण्याची गरज असल्याचे विचार शिबिरात व्यक्त केले.

चिंतन शिबिराची अध्यक्षता ओबीसी जनगणना समन्वय समितीचे मुख्य संयोजक बळीराज धोटे यांनी केली. बैठकीला ओबीसी सेवा संघ राष्ट्रीय अध्यक्ष इंजि प्रदीप ढोबळे, ओबीसी महासभा अध्यक्ष ओबीसी विजय कुमार, प्रबोधनकार अरविंद माळी, यूपीचे डॉ. वरदाणी प्रजापती, दिल्लीचे एल.सी.राठोड, आसामचे आर.एल. कुमार, शेतकरी नेते एड. अविनाश काकडे, नॅशनल स्टुडन्ट राईट असोशिएक्षण अध्यक्ष उमेश कोराम, लोक स्वराज्य पाटी अध्यक्ष बाळासाहेब गावंडे, मुंबईचे शिवशंकर सिंह यादव, बंडू हजारे, प्रा. शिंगाडे, ओबीसी सेवा संघाचे राज्य उपाध्यक्ष सावन कटरे, ओबीसीचे वरिष्ठ कार्यकर्ते खेमेंद्र कटरे, अनिल पारखी,सुरेंद्र मेंढे, भुमेश शेंडे, पी.डी.चव्हाण, श्री. बिसेन, यवतमाळचे प्रविण ढोमणे यांच्यासह विदर्भ व महाराष्ट्रातील प्रमुख ओबीसी संघटनाचे पदाधिकारी उपस्थित होते.

# धान खरेदी केंद्राची संख्या वाढवा-मंत्री छगन भुजबळ



**मुंबई :** धान खरेदी केंद्राची संख्या या हंगामात वाढवून धानखरेदी वेळेवर करा. धान खरेदी व धानभरडाई प्रक्रियेबाबत अंदाजित वेळापत्रक तयार करून वेळापत्रकाप्रमाणेच प्रक्रिया पार पडेल अशी खबरदारी सर्व यंत्रणांनी घ्यावी, असे निर्देश अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी दिले.

पणन हंगाम २०२०-२१ मध्ये किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेतंर्गत राज्यात खरेदी करावयाच्या धान व भरड धान्य खरेदी पूर्व नियोजनाची मंत्रालयातील परिषद सभागृहात बैठक झाली. अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ हे बैठकीच्या अध्यक्षस्थानी होते. या बैठकीला दूदरदृश्यप्रणालीद्वारे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक सरंक्षण राज्यमंत्री डॉ.विश्वजीत कदम, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षणचे सचिव विजय वाघमारे, महाराष्ट्र राज्य सहकारी व पणन महासंघ लिमीटेडचे व्यवस्थापकीय संचालक सुधाकर तेलंग, सर्व विभागांचे पुरवठा उपायुक्त तसेच दूरदृश्यप्रणालीव्दारे जिल्हा पुरवठा अधिकारी उपस्थित होते.

श्री.भुजबळ म्हणाले, धानाची प्रतवारी व इतर बाबीसाठी शासनस्तरावर राज्यस्तरीय भरारी पथक तयार करण्यात येणार आहे. या पथकाकडून प्रत्यक्ष स्थळी भेट देवून सर्व बाबींची तपासणी केली जाईल. या पथकाला तपासणीदरम्यान गैरप्रकार आढळल्यास सर्व संबंधितावर कडक कारवाई करण्यात येईल. पणन हंगाम २०२०-२०२१ मध्ये अनेक महत्त्वाचे निर्णय शासनाकडून घेण्यात आले होते. ऑनलाईन सातबारा, बाहेरील राज्यातून धान येणार नाही यासाठी राज्याच्या सिमा सिल करणे, धानाची गुणपत्ता यंत्रणेमार्फत तपासून घेणे, धानापासून तयार होणाऱ्या सिएमआरचे गुणवत्ता नियंत्रणेमार्फत गुणवत्ता तपासणी करून घेण्यात आले आहे. याप्रमाणेच आताही धान खरेदी करताना या निर्णयांची अमंलबजावणी केली जावी.

श्री.भुजबळ म्हणाले, धान खरेदी केंद्राबाबत स्थानिक यंत्रणांनी समन्वयानी काम करावे. धान खरेदी केंद्रावर कर्मचारी, ग्रेडर, वजन काटे, धान साठवणुकीसाठी गोदामे, मॉइशर मिटर या सर्व बाबीं उपलब्ध आहेत का याचीही तपासणीही केली जावी. फक्त नोंद असलेल्या शेतकऱ्यांकडूनच धान खरेदी करण्यात यावे. धानखरेदी केंद्राचे योग्य व्यवस्थापन होण्यासाठी धान खरेदी केंद्राबाबत शासन स्तरावर एक मध्यवर्ती माहिती संकलन कार्यालय करता येईल का? याबाबत संबंधित यंत्रणांनी चाचपणी करावी. धान खरेदी केंद्रावर प्रशिक्षित ग्रेडरची नेमणूक करावी. सर्व गोदांमाचेही योग्य व्यवस्थापन करण्यात यावे तसेच कोणताही शेतकरी धान नोंदणीपासून वंचित राहता कामा नये याचीही खबरदारी घेण्यात यावी अशा सूचनाही श्री. भुजबळ यांनी दिल्या.

मंत्री श्री.भुजबळ म्हणाले, मिलर्स सोबत करार करताना त्यांना सर्व अटी व नियम यांची माहिती देण्यात यावी. जे मिलर्स केलेल्या करारनाम्यातील अटींचे पालन करणार नाहीत त्यांच्या सक्त कायदेशीर कारवाई करण्यात यावी मिलर्सकडून प्राप्त होणारा सिएमआर ची गुणवत्ता तपासणी करण्यासाठी प्रशिक्षित गुणवत्ता यंत्रणेची नेमणूक करण्यात यावी. याबाबत शासन व भारतीय अन्न महामंडळ यांचे प्रशिक्षण शिबिरांचे आयोजनही करण्यात यावे जेणेकरून नाविन्यपूर्ण तंत्रज्ञानाची माहिती संबधित कर्मचाऱ्यांना देण्यात यावे जेणेकरून गोदामाचे व्यवस्थापन या संपूर्ण प्रक्रियेत पारदर्शकता येईल. बारदानाच्या आवश्यकतेबाबत शासन स्तरावरून माहिती संकलित करावी. ही प्रक्रिया लवकर मार्गी लावण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी. जेणेकरून बारदान व्यवस्थापन योग्य पद्धतीने करण्यात येईल अशा सूचनाही श्री.भुजबळ यांनी दिल्या.

श्री.भुजबळ म्हणाले, पणन हंगाम २०२०-२१ साठी ज्वारी, बाजरी, गहू, मका व रागी या पिकांच्या लागवडीखालील क्षेत्र व अंदाजित उत्पादन याबाबत योग्य माहिती घेण्यात यावी. जेणेकरून केंद्र शासनास भरडधान्याच्या बाबतीतील माहिती कळविण्यात येईल. भरडधान्याची प्रत व गुणवत्ता तपासूनच खरेदी करण्याबाबत सूचना देण्यात याव्यात. अशा सूचनाही अन्न, नागरी पुरवठा मंत्री भुजबळ यांनी बैठकीत दिल्या

# कुडवा ते तिरोडा मार्गाची दुरावस्था



**गोंदिया:** गोंदिया-तिरोडा मार्गावरील कुडवा नाका ते मनोहरभाई पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयाकडे जाणाऱ्या मार्गावरील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकापर्यंत रस्त्याची दुरवस्था झाली आहे. हा मार्ग राष्ट्रीय महामार्गात समाविष्ट झाल्याने याकडे दुर्लक्ष होत आहे का? असा सवालही नागरिक उपस्थित करत आहे. मात्र या प्रकाराने मार्गावरील आवागमन करणे आजघडीला अपघाताला आमंत्रण देण्यासारखेच ठरत आहे. या समस्येला घेऊन नागरिकांनी आमदार विनोद अग्रवाल यांना निवेदन दिले आहे. एकीकडे संपूर्ण देशात व राज्यात दर्जेदार रस्ते तयार होत आहेत. मात्र गोंदिया जिल्ह्याचा विचार केल्यास आजही जिल्ह्यातील राज्य, राष्ट्रीय व अंतर्गत मार्गाची अवस्था बिकटच आहे. गोंदिया-तिरोडा मार्गाची एक वेगळी ओळख आहे.

या मार्गावरच विद्युत प्रकल्पही आहे. त्यामुळे या मार्गावरुन मोठ्या प्रमाणात जड वाहतूक होत आहे. त्यातच हा मार्ग आता राष्ट्रीय महामार्गा प्राधिकरणाने अधिकृत केला असून येत्या काही दिवसातच मार्गाचे चौपदरीकरणाचे कार्य सुरु होणार आहे. परंतु गोंदिया शहरालगत असलेल्या कुडवा नाका ते मनोहरभाई पटेल अभियांत्रिकी महाविद्यालयापर्यंत जाणारा मार्ग आजघडीला जीव घेणारा ठरत आहे.

### ही समस्या मार्गी लावा

या मार्गावर पडलेले खड्डे अपघाताला केव्हा आमंत्रण देतील हे सांगण्याची गरज नाही. याबाबत मागील काही दिवसांपासून नागरिकांनी मोर्चा उघडला आहे. परंतु संबंधित विभागाने सदर मार्ग राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाला हस्तांतरित झाल्याने त्यांची हात झटकले आहे. अशा परिस्थितीत एखाद्या मोठ्या अपघाताची वाट यंत्रणा बघत आहे का? असा सवाल उपस्थित झाला असून परिसरातील नागरिकांनी शुक्रवार २७ ऑगस्ट रोजी आमदार विनोद अग्रवाल यांना बोलावून व रस्ता दाखवून त्या ठिकाणी रस्ता दुरुस्तीसाठी निवेदन दिले. दरम्यान, आमदार अग्रवाल यांनी ही समस्या त्वरित मार्गी लावण्यात येईल असे आश्वासन नागरिकांना दिले.

# मृतांच्या नातेवाईकांना धनादेश सुपूर्द



**गोंदिया:** तालुक्यातील चुटीया येथील सोमलाल सोनू टेंभरे यांच्या शेतात काम करताना विद्युत धक्क्याने दोन महिन्यापुर्वी मृत्यू झाला होता. सोमलाल यांच्या नातेवाईकांना आमदार विनोद अग्रवाल यांच्या हस्ते चार लाखांचे धनादेश सुर्पूद करण्यात आले.

चुटिया येथील सोमलाल टेंभरे यांचा शेतात काम करतना विजेच्या धक्क्याने मृत्यू झाला होता. आमदार विनोद अग्रवाल यांना माहिती मिळताच मृताच्या कुटुंबियांना सांत्वन दिल्यानंतर घटनेची माहिती प्रशासनाला दिली व कुटुंबियांना सरकारकडून आर्थिक मदतीचे आश्वासन दिले. घरातील कर्ता पुरुष गेल्याने कुटुंबियावर दुःखाचा डोंगर कोसळला. मृताच्या कुटुंबियाचे सांत्वन करण्यासाठी युवा नेते रोहित अग्रवाल यांनीही त्यांच्या घरी पोहोचून त्यांचे सांत्वन केले. आमदार अग्रवाल सतत सरकार व त्यांच्या कुटुंबाकडून आर्थिक मदत मिळण्यासाठी प्रयत्न करीत होते.

दरम्यान एक छोटी भेट म्हणून सोमलाल टेंभरे यांच्या नातेवाईकांना ४ लाखांचा धनादेश सुपूर्द करण्यात आला. याप्रसंगी तहसीलदार पालांदूरकर, नगर परिषद उपाध्यक्ष शिव शर्मा, तलाठी अंकेश शेंडे, रोहित अग्रवाल, सरपंच कैलास गजभिये, उपसरपंच अजित टेंभरे, कैलास ठाकरे, कपिल राणे आदि उपस्थित होते.

### विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता पदभरती १४ व १५ सप्टेंबरला मुलाखती

**गोंदिया :** जिल्हाधिकारी कार्यालयाने ३ फेब्रुवारी २०२१ ला प्रसिध्द केलेल्या जाहिरातीनुसार ११ विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ताची पदे भरण्याकरीता इच्छुक उमेदवारांनी ६२ अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयात सादर केले होते. जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे गठीत समितीद्वारे ६२ अर्जांची/उमेदवारांची छाननी करुन पात्र/अपात्र यादी तयार करण्यात आली. पहिल्या छाननीत ३६ अर्जदार मुलाखतीसाठी पात्र ठरविण्यात आले आणि उर्वरित २६ अर्जदार अपात्र ठरविण्यात आले. त्यानंतर अपात्र उमेदवारांकडून आक्षेप अर्ज मागविण्यात आले. एकूण ७ आक्षेप अर्ज प्राप्त झाले. अर्ज छाननी समितीने ३ ऑगस्ट २०२१ रोजी सर्व प्राप्त ७ आक्षेप अर्जांची छाननी केली. मात्र त्यांना पात्र ठरविता येत नाही असे अभिप्राय दिले आहे. पात्र उमदवारांची १४ व १५ सप्टेंबर २०२१ रोजी सकाळी १० वाजेपासून जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया येथे मुलाखत घेण्यात येणार आहे. पात्र उमेदवारांनी नियोजित तारखेला सर्व मूळ दस्ताऐवजांसह न चुकता उपस्थित राहावे. नियोजित वेळेस उपस्थित न राहिल्यास किंवा उशिरा उपस्थित झाल्यास त्यांचा फेरविचार केला जाणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी. पुवी प्रसिध्द करण्यात आलेल्या पात्र उमेदवारांची यादी अनुक्रमांक १ ते १८ पर्यंत १४ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता. तसेच अनुक्रमांक १९ ते ३६ पर्यंत १५ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता मुलाखत सुरु होईल. असे अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी जयराम देशपांडे यांनी प्रसिध्दी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# जिल्हा किसान कॉंग्रेसच्या वतीने शेतकऱ्यांचा सन्मान व रक्तदान शिबिर



**गोंदिया :** शेतकऱ्यांची परिस्थिती सावरावी तसेच त्यांनाही सन्मानाने जगता यावे, यासाठी कॉंग्रेस प्रयत्नशिल आहे. त्याच अनुसंगाने जिल्हा किसान कॉंग्रेसचे अध्यक्ष जितेश राणे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून किसान कॉंग्रेसच्या वतीने शेतकरी सन्मान व रक्तदान शिबिराचे आयोजन २५ ऑगस्ट रोजी करण्यात आले होते. या कार्यक्रमात शेतकऱ्यांना प्रमाणपत्र देवून मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

शेतकऱ्यांच्या उत्पादिक मालाला हमीभाव मिळावा, स्वामीनाथन आयोग लागु व्हावा, यासाठी कॉंग्रेस केंद्र शासनाला वारंवार पाठपुरावा करीत आहे. त्यातच राज्य शासनाच्या वतीने देण्यात आलेला सोयी सुविधा शेतकऱ्यांना अजून किती चांगल्या प्रकारे देता येतील, यासाठी कॉंग्रेस प्रयत्नशिल आहे. शेतकऱ्यांचे हित कॉंग्रेस पक्षात आहे. ही बाब हेरून जिल्हा कॉंग्रेस किसान संघटनेचे अध्यक्ष जितेश राणे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून शेतकऱ्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

आयोजित कार्यक्रमाला कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष डॉ.नामदेवराव किरसान, माजी जिल्हाध्यक्ष पुरूषोत्तम कटरे, ओबीसी संघटनेचे जिल्हाध्यक्ष जितेंद्र कटरे, माजी जि.प.सभापती पी.जी.कटरे, राजकुमार पटले, राजीव ठकरेले, जीवन शरणागत यासह किसान कॉंग्रेस संघटनेचे सर्व तालुकाध्यक्ष व पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी मान्यवरांच्या हस्ते शेतकऱ्यांना प्रमाणपत्र देवून मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले.

# कटकमंडळ प्राथमिक शिक्षकांच्या समस्या मार्गी लावा

**गोंदिया :** महाराष्ट्रातील महानगरपालिका, नगर परिषद व कटक मंडळ प्राथमिक, माध्यमिक शिक्षकांच्या प्रलंबित समस्या मार्गी लावण्यात याव्यात म्हणून शिक्षक सहकार संघटना महाराष्ट्र राज्यच्या शिष्टमंडळाने आमदार परिणय फुके यांच्या नेतृत्वात नगर विकास विभागाचे प्रधान सचिव महेश पाठक यांची भेट घेऊन चर्चा केली. महाराष्ट्रात एकूण २७ महानगरपालिका व २२८ नगर परिषदा अ, ब आणि क वर्ग अशा तीन वर्गवारीत आहेत. कटक मंडळेसुद्धा आहेत. ज्यामध्ये शिक्षकांचे प्रश्न अनेक वर्षांपासून प्रलंबित आहेत.

संबंधित प्रश्न तातडीने सोडविण्यासंदर्भात शिक्षक सहकार संघटना सतत पाठपुरावा करीत असते. आता शिक्षक सहकार संघटनेने महाराष्ट्राचे राज्यपाल, मुख्यमंत्री व नगर विकासमंत्री यांना निवेदन दिले. २००५ नंतर नियुक्त मनपा, न.प व कटक मंडळांमधील शिक्षकांना जुनी पेंशन योजना लागू करण्यात यावी, अ तसेच ब वर्ग नगर परिषदा आणि महानगरपालिका शिक्षकांचे वेतन नगर विकास व शालेय शिक्षण विभागाकडून होत असल्यामुळे दरमहा वेतन उशिरा होते, त्यामुळे हे वेतन दोन विभागांकडून न होता शंभर टक्के वेतन शिक्षण व क्रीडा विभागाकडून प्रदान करणे, शिक्षकांना १०,२०, ३० सेवाअंतर्गत आश्वासित प्रगती योजना लवकरात लवकर लागू करणे, नगर परिषद व महानगरपालिकेतील जीपीएफ खातेधारक शिक्षकांना शासकीय नियमाप्रमाणे व्याजदर मिळत नाही त्यांचे जीपीएफ खाते हे कोषागारमध्ये नसल्याने त्यांना व्याज बचत खाते मिळत नाही, शिक्षकांना जिल्हा परिषद शिक्षकांप्रमाणे सण अग्रिम मिळत नाही, ते देण्यात यावे, जिल्हा परिषदेप्रमाणे, नगर परिषद व महानगरपालिका शिक्षकांच्या ऑनलाइन बदल्या कराव्या, बदली झालेल्या शिक्षकांना सेवा ज्येष्ठतेचा लाभ देण्यात यावा, बदल्यांसाठी शिक्षण समितीची व सर्वसाधारण सभेच्या ठरावाची गरज असू नये. शिक्षण सेवकांचे मानधन मानधन सहा हजार रुपयांवरुन २० हजार रुपये करण्यात यावे यासह अन्य मागण्यांचा समावेश होता. आ. परिणय फुके यांनी मागण्या रास्त असून त्या त्वरित सोडवाव्यात, असे प्रधान सचिव पाठक यांना सांगितले. शिष्टमंडळात संतोष पिट्टलवाड, विभागीय अध्यक्ष रविकुमार अंबुले, रवी ढगे, सुरेंद्र गौतम, लाखेश्वर लंजे यांचा समावेश होता.

# देशातील २३ पैकी १८ राष्ट्रीय विधी विद्यापीठातील प्रवेशात ओबीसी आरक्षण धोरणाला खो

## विधी विद्यापीठात ओबीसी आरक्षण लागू करण्याकरीता राष्ट्रीय ओबीसी मुक्ती मोर्च्याचे निवेदन



नागपूर- देशातील २३ राष्ट्रीय विधी(नॅशनल लॉ) विद्यापीठापैकी १८ विद्यापीठात पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम संदर्भातील ऑल इंडिया कोटा व राज्य डोमीसाईल कोट्यातील प्रवेशात अद्यापही ओबीसीना आरक्षण धोरण करण्यात न आल्याने या प्रवर्गातील विद्यार्थ्यांवर केंद्रसरकारने अन्याय केल्याची टिका राष्ट्रीय ओबीसी मुक्ती मोर्च्याच्यावतीने करण्यात आली आहे.यामध्ये पुरोगामी विचारधारेच्या महाराष्ट्र राज्यातील मुंबई,नागपूर व औरगांबाद येथील राष्ट्रीय विधी विद्यापीठाचाही समावेश आहे.या विधी विद्यापीठाच्या प्रवेशामध्येही ओबीसींना आरक्षण देण्यात यावे,यासंदर्भातील मागणीचे निवेदन राष्ट्रीय ओबीसी मुक्ती मोर्च्याच्यावतीने राष्ट्रीय ओबीसी आयोग व महाराष्ट्र व गोवा बार कॉंन्सील अध्यक्ष ॲड अनिल गोवरदिपे यांना उपजिल्हाधिकारी अविनाश कातडे यांच्या मार्फेत पाठविण्यात आले.

देशात सध्या २३ राष्ट्रीयविधी विद्यापीठ असून महाराष्ट्रात ३ आहेत.हे विद्यापीठ राज्य सरकारच्या विविध कायद्या अंतर्गत स्थापित आहे. या विधी विद्यापीठातील अभ्यासक्रम हे युजीसी अंतर्गत प्रमाणीत आहे.तर बार कॉन्सील ऑफ इंडिया आणि केन्द्रीय विधी व न्याय विभागाचा एक भाग आहे. याचा अर्थ केन्द्र व राज्य सरकारचे उच्च शिक्षण संबधाने प्रवेशातील आरक्षण धोरण या विधी विद्यापाठीसाठीही लागू असणे अपेक्षित असतांनाही २३ पैकी केवळ ५(गांधीनगर, भोपाळ,सोनीपत,रांची व दिल्ली येथील) राष्ट्रीय विधी विद्यापीठात ओबीसी आरक्षण धोरण लागू केले आहे. इतर १८ विद्यापीठात अद्यापही पदवी व पदव्युत्तर प्रवेशात ओबीसी आरक्षण धोरण स्विकारले गेले नसल्याची माहिती राष्ट्रीय ओबीसी मुक्ती मोर्च्याचे मुख्य संयोजक नितिन चौधरी यांनी दिली.

या २३ राष्ट्रीय विधी विद्यापीठाच्या पदवीकरिता २७३२ जागा आहेत. त्यापैकी १६३५ जवळपास ६०% जागा या ऑल इंडिया कोट्यातील प्रवेश आहे. तर पदव्युत्तर करिता १९ राष्ट्रीय विधी विद्यापीठात ९५२ जागा आहेत. यापैकी ७९८ जवळपास ८७% जागा ऑल इंडिया राखीव कोट्यात भरण्यात येतात.आणि उर्वरित जागा त्या राज्य शासनाच्या ओबीसी आरक्षण धोरणानुसार भरणे अपेक्षित होत्या.

परंतु ऑल इंडिया राखीव कोटा असो की, राज्य राखीव जागा दोन्ही बाबतीत ओबीसी आरक्षण धोरण लागू केले नसल्याने शेकडो ओबीसी विद्यार्थी आरक्षणाच्या हक्कापासून सोबतच फी सवलतीच्या धोरणाची अमलबजावणी नसल्याने विधी अभ्यासक्रमापासून वंचित ठेवण्याचा प्रकार विधी विद्यापीठ प्रशासनाने केल्याचे निवेदनात म्हटले आहे.

या सर्व राष्ट्रीय विधी विद्यापीठातील पदवी व पदव्युत्तर प्रवेशात किमान २००७ पासून आरक्षण धोरण लागू होणे अपेक्षित होते.कारण उच्च शिक्षण संस्था प्रक्रिया प्रवेशात आरक्षण संबधाने २००६ कायद्यानुसार संविधानात १५-५ हे संशोधन करण्यात आले होते.महाराष्ट्रातील तर सर्व राष्ट्रीय विधी विद्यापीठ मुंबई, नागपूर व औरंगाबाद हे २०१४, २०१६ व २०१७ दरम्यान स्थापन करण्यात आल्याने यात ओबीसी आरक्षण धोरण लागू होणे क्रमप्राप्त होते.मात्र येथेही लागू करण्यात आलेले नाही.

- मुंबई राष्ट्रीय विधी विद्यापीठ अंतर्गत पदवी करिता १०० जागा असून ३७ जागा ऑल इंडिया कोट्यात व पदव्युत्तरच्या ५० पैकी १७ जागा या ऑल इंडिया कोट्याकरिता राखीव आहे.नागपूर राष्ट्रीय विधी विद्यापीठाच्या पदवीच्या १२० पैकी ४५ व पदव्युत्तरच्या २० पैकी १८ जागा आणि औरंगाबाद राष्ट्रीय विधी विद्यापीठाच्या पदवीच्या ६० पैकी २३ जागा तर पदव्युत्तरच्या २० पैकी १८ जागा ऑल इंडिया कोट्याकरिता राखीव आहेत.याकडे बघितल्यास सर्वच जागा केंद्रीय कोट्याकरीता राखीव असतांना उच्च शिक्षणातील ओबीसी आरक्षणाचे धोरण मात्र लागू करण्यात आलेले नाही.

राज्यातील उर्वरीत जागांकरीताही ओबीसीशिवाय एससी व एसटीला सुध्दा आरक्षण धोरण लागू केलेले नाही, करण्यात यावी याकरीता राष्ट्रीय ओबीसी आयोगाच्या व महाराष्ट्र गोवा बार कॉन्सील ऑफ इंडियाच्या निदर्शनास आणून देण्यासाठी राष्ट्रीय ओबीसी मुक्ती मोर्चा तर्फे मुख्यसंयोजक नितीन चौधरी यांच्या नेतृत्वाखाली ॲड. रमेश कोठाळे, भुषण दडवे, ॲड. अशोक यावले , मोहन कारेमोरे ,अरुण पाटमासे व कृष्णकांत मोहोड यांच्या शिष्टमंडळाने निवेदन सादर केले आहे

# अमरावतीत हॉटेलला आग, एकचा मृत्यू

**अमरावती**-राजापेठ पोलिस ठाण्यासमोर असलेल्या हॉटेल इंपेरियलला मंगळवारी पहाटे ३ वाजता भीषण आग लागली. या आगीच्या धुराने एकाचा गुदमरून मृत्यू झाला. हॉटेलचे दहा लाखाचे नुकसान झाल्याचा अंदाज आहे. दिलीप चंद्रकांत ठक्कर (वय ५५ रा. नागपूर) असे मृत्यू झालेल्या व्यक्तीचे नाव आहे.

केबल नेटवर्कचे कामासाठी ते अमरावतीला आले होते व सदर हॉटेलमध्ये मुक्कामाला होते. दरम्यान मंगळवारी पहाटे हॉटेलला अचानक आग लागली.

आग लागल्याचे लक्षात येताच पोलिस कर्मचारी धावले, अग्निशमन विभागाचे पथकही पोहचले. आग लागताच हॉटेलच्या खोल्यांमध्ये धूर दाटला. त्यातल्याच एका खोलीत दिलीप ठक्कर होते.

जीव गुदमरल्याने त्यांचा मृत्यू झाला. अन्य पाच जणांना सुखरूप बाहेर काढण्यात यश आले. ही आग शॉटसर्किटमुळे लागल्याचा अंदाज आहे. सर्वांच्या प्रयत्नाने आगीवर नियंत्रण मिळविण्यात आले.


**महाराष्ट्र जीवन प्राधिकरण**

**ई-निविदा सुचना क्र.१२ सन २०२१-२२ दुसरी वेळ**

म.जी.प्रा. विभाग गोंदिया अंतर्गत गोंदिया जिल्ह्याकरिता भाडेतत्वावर एक वर्षाकरीता एकुण ३ वाहने लावण्याच्या कामाच्या निविदा वाहन एजन्सीकडून मजीप्रा मार्फत मागविण्यात येत आहे. सदर निविदेचा सविस्तर तपशील दि.०१.०९.२०२१ पासून www.mahatenders.gov.in या वेबपोर्टलवर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

निविदा प्रक्रिया कार्यक्रमाचा सर्व तारखा www.mahatenders.gov.in या वेबपोर्टलवर अपलोड करण्यात आलेल्या ऑनलाईन निविदा सुचनेनुसार राहतील.

**कार्यकारी अभियंता**
**म.जी.प्रा. विभाग, गोंदिया**